# <u>सदा=नेहमी</u>

सदा माझ्या अस्तित्वाची जाणीव

मी तुला करून देईन देवा

नाही विसरू देणार कधी मला

तुला आठवण करून देईन सदा ...

सदा सत्कार्य करीन देवा

नाही दुखवणार कधी कुणा

सुखावह दीर्घायुष्य दे मला

तुझ्या मनासाठी वागेन सदा...

सदा राहीन सृष्टीचा घटक मी

वाहत्या काळाची पथदर्शक मी

अशी भेट देईन तुझ्या जगास

काळ सृष्टी जतन करतील सदा...